# परीसस्पर्शाचा अनुभव



कुणाल कपूर

मी कुणाल कपूर. शिक्षणानं संशोधक असलो तरी माझ्या निवडीनुसार मी पुढे सिस्टीम-डिझाईनर झालो आणि अपघातानं इंजीनियरचं कामही केलं. संशोधन संस्था आणि कॉर्पोरेट क्युबिकल यांच्यात मी अशी चाळीस वर्षं घालवली. नंतर रियाधमध्ये एका प्रकल्पावर काम करत असताना एका वादविवादानंतर राजीनामा देऊन, मी माझ्या मनात दहा-पंधरा वर्षं ठाण मांडून बसलेली स्वप्नं पुरी करायला परत आलो. मला निसर्ग जाणून घ्यायचा होता, त्याची लय आत्मसात करायची होती आणि हीच गोष्ट केंद्रस्थानी असलेली एक शाळा सुरू करायची होती. वर्षभर मी शेती शिकलो, हिमाचलमध्ये प्रवासी कंपनी चालू करायचा प्रयत्न केला, आता मी माझ्या जन्मगावी  भोपाळला परत आलोय. थोडी जमीन सारखी करून घेतलीय आणि त्यावर शाळा सुरू करू पाहतोय. कुणी विचारते, कोणत्या प्रकारची शाळा... तर तिथे मीच पहिला विद्यार्थी आहे, एवढेच मला माहीत आहे!

शिकणं म्हणजे काय, मुलं नैसर्गिक वातावरणात स्वाभाविकपणे शिकावीत यासाठी शाळा कशी असायला हवी, हे कळावं म्हणून मी गेली अकरा वर्षं प्रयत्न करतोय. मोकळ्या वातावरणात शिक्षण होतं, गच्च कोंबलेल्या वर्गखोल्यांमध्ये नाही, हे आपल्याला सर्वांना माहीत आहे. गांधीजींपासून अरविंदांपर्यंत ते ओशोंपर्यंतही सगळ्या महामानवांनी शिक्षणाबद्दल बरंच काही म्हणून ठेवलंय, पण त्यांच्यातल्या कुणीही शाळा चालवलेली नव्हती. एखाद्या गोष्टीचं तत्त्व शोधणं मानवी आहे, पण ते प्रत्यक्षात आणणं हे अद्भुत महामानवी प्रतिभावंतच करू जाणे.

अनेक वर्षं विचार करकरून आणि अनंत काळ त्यामागची तात्त्विक भूमिका पडताळून मी शेवटी माझ्या मनाचा कौल मानला, आणि वातानुकूलित सुखासीन नोकरीवर लाथ मारून अशा काही महामानवांना प्रत्यक्ष बघायला जायचं ठरवलं. सिद्धांतांच्या आणि तात्त्विक बैठकांच्या गदारोळात न



पडता ह्या लोकांनी काय उभारलंय, त्यांच्या त्यामागच्या प्रेरणा काय होत्या, त्या प्रत्यक्षात आणण्यासाठी त्यांनी नेमकं काय केलं हे मला प्रत्यक्ष बघायचं होतं.

वाचनातून, मित्रांशी – कार्यकर्त्यांशी झालेल्या चर्चांमधून एका जोडप्याचं काम या अर्थानं बघण्याजोगं असल्याचं दिसलं. ही माणसं कुणा जेष्ठाश्रेष्ठांची पाईक नव्हती, तुमच्या बाळाला



शिकायला मदत करण्यासाठी भारंभार पैसे घेणारी कुणी जगप्रसिद्ध नामांकित मंडळी नव्हती, तर जगणं समजून घेण्यात आपलं आयुष्य वाहणारी साधी माणसं होती. जीवनाचा अर्थ समजावून घेऊन त्याचं मर्म तळहातावर उचलून घेत त्यांना ते मुलाबाळांपर्यंत पोचवायचं होतं. माझं ठरलं, पहिल्यांदा नागरकुडलला मीनाक्षीकडे जायचं. हे ठिकाण धर्मपुरी–सालेम हायवेवर नल्लापल्लीपासून नऊ किमी.वर आहे.

मागच्या वर्षीच्या नोव्हेंबरमध्ये मी नागरकुडलला पोचलो तेव्हा दुपार झाली होती. पुविधाम लर्निंग सेंटर तिथून किलोमीटरभर अंतरावर होतं. मी चालत निघालो. शेजारून जाणारी एक सरकारी जीप मला बघून थांबली. मी मीनाक्षीकडे चाललेलो असल्याचा अंदाज त्यांना आलेला असावा. विचारल्यावर मीही मान डोलावली. ते तत्परतेनं खाली उतरले. माझी बॅग उचलून घेत त्यांनी जीपचं मागचं दार उघडून मला आत घेतलं. माझी यजमानीण या भागातली फार मोठी सामाजिक कार्यकर्ती असल्याचं मला त्यांच्याकडून कळलं. तिचं काम बघायला जाण्याच्या माझ्या निर्णयाबद्दल त्यांनी माझंही कौतुक केलं. आपल्यासारख्या मर्त्य जीवांचे हात पोचणार नाहीत इतकी ती थोर सामाजिक कार्यकर्ती असल्याचं त्यांचं मत होतं. सामाजिक कार्यकर्ती, या शब्दानं मी विचारात पडलो.

मी भेटायला गेलो तेव्हा मीनाक्षी सातवी आठवीच्या वर्गाला गणित शिकवत होती. अस्खलित तमिळमध्ये ती बोलत होती, ती मूळची मेरठची आहे, हे तेव्हा मला माहीत नव्हतं, असतं तरी माझा विश्वास बसला नसता. आता ती अगदी याच मातीतून उपजल्यासारखी इथली झालीय, आणि बोले तैसा चाले या उक्तीप्रमाणे मुलाबाळांनी जीवनाला हिमतीनं भिडावं यासाठी प्रयत्न करते आहे.

तमिळनाडूत पाण्याचं दुर्भिक्ष्य असलेली कोरडवाहू जमीन आपल्या मालकीची असणं, ही काही फारशी भाग्याची बाब नाही. मीनाक्षीनं इथंच आपली मठी उभारली आहे, तिथं शंभर मुलंमुली येतात, आणि गणित, विज्ञान, इंग्लीश, तमिळ, हस्तकला, शेती आणि जगायलाही शिकतात. हे आयुष्य त्यांना वळण लावतं, मजा करायची (तीही भरपूर) मोकळीक देतं, हवं असलं तर इथं रहायलाही मिळतं. यात कराटे शिकण्यापासून दुपारी चार वाजता मधल्या वेळचं खाणं तयार करण्यापर्यंतचा समावेश आहे, त्यात अकरा वाजताच्या नाचणीच्या बिस्किटाची चैनही गृहीत आहे.

एखाद्या स्विस घड्याळाप्रमाणे इथं सगळं सहज सुरळीत सुरू असतं. शिक्षकांना त्यांनी काय करायचं ते कळलेलं असतं, मुलांना आणलं जातं, परत सोडलं जातं, आवश्यकता असेल तर पाणी आणलं जातं, बाहेरच्या जगाशी संपर्क साधला जातो, कारण बालकांना बाहेरच्या मोठ्या जगाची ओळख व्हायला हवी. ही शाळा म्हणजे गावाचा अभिमान आहे. तेही पुविधामपासून अगदी जवळच एक सरकारी शाळा असताना घडलेलं आहे. कचरा टाकण्याआधी मुलं प्लास्टिक, धातू आणि कागद एकमेकांपासून सोडवून त्याचा पुनर्वापर करतात. पाइपनं वरच्या टाकीत पाणी भरतात. इडलीचं पीठ वाटण्यासाठी मेरी गो राउंडवर खेळतात, इतकंच नाही तर नैसर्गिक सोनखतही आपलं आपण तयार करतात. जेवताना मुलामुलींना दही मिळावं म्हणून इथे गायींची देखभाल केली जातेच, पण त्याहून अधिक मुलांनी प्राण्यांशी जिव्हाळ्यानं वागायला शिकावं हेही त्यामागचं कारण असतं.

इथलं प्रत्येक मूल आपल्या अंगभूत वैशिष्ट्यानं उठून दिसतं. पुविधाममधले सगळे शिक्षक आणि मीनाक्षी त्यांना स्वत:ला शोधण्याचा अवकाश आणि अवसर देतात. त्यामुळे लोकेश जेव्हा बुद्धिबळाच्या पटावर आपल्या तर्काला न झेपणारी अशी एखादी अद्भूत खेळी करतो, तेव्हा आपल्याला त्याच्यासोबत सावकाशीनं बसून त्यामागची कल्पना समजावून घ्यावी लागते. त्यामागे सरळसोट तर्काचं गणित नसतं, त्याला गणितात चांगली गती आहेच हेही त्यातून आपल्याला कळतं. हेमंतला हस्तकलांमध्ये प्रावीण्य आहे. दुसरं कुणी पेंटींगमध्ये गती असलेलं आहे. पुविधाममध्ये शांतिनिकेतनमधून आलेले राजेश हस्तकला

आणि रंगरेषा यांमधले निपुण आहेत. आपल्या विद्यार्थी कलाकारांना घेऊन ते पुविधामच्या परिसरात कुठे कुठे, किंवा बस स्टँडवरची किंवा पुविधामपासून एक किलोमीटरवर शेजारच्या गावातली एखादी टाकाऊ भिंत रंगवतात. लोकेशची बहीण उत्तम खेळाडू आहे. तिला पकडायला गेलेल्या मुलांना ती इतकी सफाईनं चकवते की हाती येतच नाही.



आपण नुसते बोलतो, किंवा कल्पना करत राहातो, अशी जागा खेड्यातल्या मुलाबाळांसाठी प्रत्यक्षात उभारून झाल्यावरही दिसणारी मीनाक्षीची नम्रता ही तिथली सगळ्यात थक्क करणारी बाब आहे. तिची एकंदरीनं माणसांबद्दल, मुलांबद्दल, जीवनाबद्दल आणि शाळेबद्दल असलेली समज मुळातूनच इतकी स्वच्छ आहे की त्याहून सुस्पष्ट काही असूच शकत नाही, कुणाला त्यात कुठली गुंतागुंत आणताही येणार नाही. माझ्यासारख्यासाठी शिक्षण आणि शिकणं म्हणजे – भीती घालवणं, भावना इच्छा प्रेरणांच्या बळावर आपली क्षमता वाढवणं, आणि या जगात कुणा व्यक्तीला कसं जगायचं आहे ते शोधायला मुभा असणं; ते तिथे दिसतं.

मुलं कधीकधी आळस करतात. मीनाक्षी अशावेळी त्यांना बजावते. ही जागा चालवायला किती काय लागतं, आणि मुलांनी मोठ्यांना गृहीत धरू नये, उलट एका समजदार दृष्टिकोनातून बघावं अशी जाणीव करून देते. मुलंही मीनाक्षीचं म्हणणं समजावून घेतात, त्याबद्दल विचार करतात आणि त्यानुसार आवश्यक ते बदलही करतात. मी तिथं असताना काही मुलं हस्तकलात्मक वस्तूंची विक्री करत होती, त्यांचं कलाकौशल्य बाहेरच्या जगासमोर आणत होती, तर काहीजण यंत्रशास्त्राचा आणि विद्युतयांत्रिकीचा अभ्यास करून पिठाचा रुबवा स्वयंचलित करण्यात गुंतली होती. पूजा आणि मेखलासारख्या मुली आळशी पोरांना वसतिगृहातली स्वच्छता करायला लावत होत्या, त्यातही हे काम पुढे न सांगता आपणहून व्हावं अश्या व्यवस्थाही लावत होत्या. त्यांची समज, तयारी, आणि गटाचं पुढारपण घेण्याची क्षमता यातूनच पुढे अपेक्षित बदल घडणार आहेत.

या जगात कुणीच सर्वगुणसंपन्न नसतं. तुम्ही तसे नाही आहात आणि मीही. तसंच पुविधामही आदर्श आहे असं नाही, आणि मीनाक्षीला हे माहीत आहे. इतकं सगळं करून झाल्यावरही ती अजूनही इकडे तिकडे विचारत असते, बघत असते, बोलत असते, काही करून पाहात असते, की जेणेकरून इथल्या मुलाबाळांचं जगणं अधिक चांगलं व्हावं, म्हणजे इथून गेल्यावर ते बाहेरच्या जगाला एक विधायक गती देऊ शकतील. इथल्या विद्यार्थ्यांसाठी आणि शिक्षकांसाठी तर ती अतिशय उत्तम शिक्षिका आहेच, गावातल्या लोकांची ती एक आदर्श आहे. ती आता त्या भागात जलसंधारण कसं करता येईल यासाठी गावातल्या लोकांना संघटित करते आहे, काही महिलांना पंचायतीच्या निवडणुकीला उभं राहायला प्रोत्साहन देते आहे. अतिशय शांत पण ठामपणानं, निश्चित वाटेनं, लावून धरून, न कंटाळता तिची वाटचाल चालू आहे. एखाद्या कामासाठी कधी अनवाणी तर कधी वाहनावर चक्कर मारत असते, तेव्हा ती आपणातच तरारून उठलेली दिसते. काम ती आपणहून पुरं करते, दुसरं कुणी येऊन काय करायला हवं ते पाहील, करेल अशी वाट पाहत नाही. ते पाहून तुम्ही मनातल्या मनात शरमून जाता. तुमच्या मर्त्य जिवाला उडायला लावणारे जणू पंख मिळतात, तुम्हाला खडबडून उठायला लावणारा विजेचा झट्का असतो तो, तुमच्या मर्यादांना दूर सारून बदल घडायला लावणारा.

हे सगळं तर आहेच, त्याशिवाय मी खाल्लेलं सर्वात रुचकर दक्षिण भारतीय जेवण म्हणजे मीनाक्षीनं बनवलेलं खाणं. ती लोणची फार उत्तम बनवते, तिची कॉफी विशेष चांगली असते. इथली मुलं अलो व्हेराचा म्हणजे कोरफडीचा स्वस्त आणि मस्त साबण बनवतात, इथल्या स्वयंपाकघरातल्या दोन मावश्या मुलांसाठी फर्मास जेवण बनवतात, माझ्यासारखा पाहुणाही त्याच्यावर भरपूर ताव मारतो.

मी पुविधामच्या परिसरात पंचवीस दिवस होतो, आणि एकदाही मला परकं वाटलं नाही. या सगळ्या दिवसांमध्ये इथल्या मुलांनी मला जिवामोलानं आपलं मानलं. या जगाची फसवी कावेबाज पद्धत माझ्या हाडीमाशी रुजलेली आहे. या इथे मला पहिल्यांदा 'त्या' माझ्यापासून मुक्ती मिळाली, कारण मी जसा आहे तसा त्या मुलांनी मला स्वीकारलं आणि त्यांच्या जगाची दारं माझ्यासाठी खुली केली.

**– कुणाल कपूर**

# पृथ्वीच्या प्रेमाचे पाईक



– जी. माधवराज
– राजेश्वरराव दड्डा
– मुथुलिंगम
– रामेश्वरी

मी १९९९ पासून पुविधाममध्ये शिक्षक म्हणून काम करतो. इथं आलो तेव्हा मी अगदीच अननुभवी होतो आणि मग मी स्वतःच विद्यार्थी झालो.

मी ह्याच परिसरात जन्मलो आणि लहानाचा मोठा झालो. माझं माध्यमिक शिक्षण पूर्ण झालं, पुढं शिकायची इच्छा नव्हती. काहीतरी लहानमोठ्या नोकऱ्या करत भटकत होतो. भविष्यात काय करायचं याबद्दल अजून काहीच ठरवलं नव्हतं. बांधकामाची कामं करत होतो पण त्यात तशी फारशी मजा नव्हती. मग एका मित्राकडून मला मीनाक्षी आणि उमेश यांच्याबद्दल समजलं. त्यांना एक वेगळीच शाळा सुरू करायची होती आणि त्यासाठी त्यांना एका पुरुषशिक्षकाची गरज होती.

मला अजून इथला पहिला दिवस आठवतो. मीनाक्षी आणि उमेश यांनी मला सांगितलं की त्यांच्या शाळेत पुस्तकं, गृहपाठ, परीक्षा, मार्क्स यापैकी काहीच नसेल. हे ऐकल्यावर मी कोड्यात पडलो. पुस्तकं आणि परीक्षा यांच्याशिवाय कशी शाळा? मी आत्तापर्यंत पाहत आलेल्या पद्धतीच्या विरुद्ध ही गोष्ट होती. माझा फारसा विश्वासही त्यांच्यावर बसला नाही. पण एक गोष्ट माझ्या लक्षात आली होती की मीनाक्षी आणि उमेश इंग्रजीमध्ये बोलत असत आणि त्यांचं राहणीमानसुद्धा इथल्या गावकऱ्यांपेक्षा थोडं वेगळं होतं. मी एक संधी घ्यायचं ठरवलं. मला जाणवलं होतं की पुविधाममध्ये गेलो तर नक्कीच चांगलं, नवं काहीतरी शिकेन.

माझं गाव – बालजंगमनहळळी – इथून जवळच थोड्याशा चढावर आहे आणि पुविधाम त्याच्यापेक्षा थोडं खाली आहे. माझे एक काका मला नेहमी चिडवतात की आयुष्यात प्रत्येकजण वर जाण्याचा प्रयत्न करतो आणि तू मात्र खाली जातोस. गावातले लोक रोजीरोटीसाठी धर्मपुरीला वर जायचे आणि मी मात्र खाली उतरून पुविधामला यायचो.

शाळेत असताना मी अभ्यासात फारसा बरा नव्हतो. विशेषतः इंग्रजीच्या बाबतीत तर अडचणच होती. इतर मुलांचीही परिस्थिती काही फार वेगळी नव्हती. मीनाक्षीने मला aa (आ), baa (बा), caa (का) असं उच्चारांवरून स्पेलिंग करायला शिकवलं. त्यामुळे मला भाषा शिकायला बरीच मदत झाली. मीनाक्षी आणि उमेश एकमेकांशी तमिळमध्ये बोलत, तरी मी आवारात शिरताच ते इंग्रजीतून बोलायला लागायचे. त्यामुळे हळूहळू मग मला इंग्रजी बोलता यायला लागलं. त्यावेळचं माझं इंग्रजीमधून गोष्ट वाचणं आणि तमिळमध्ये तिचं भाषांतर करणं मला अजून आठवतं. तुम्ही कोणतंही भाषांतर करता तेव्हा तुमच्या स्वतःच्याच भाषेतल्या कितीतरी नवीन गोष्टी तुम्ही शिकता.

त्या काळात मला जाणीव झाली की परीक्षेवर आधारित शिक्षण हे खरं शिक्षण नव्हे. तुमचं खरं शिक्षण आयुष्यभर चालूच असतं.

जून २००० मध्ये मीनाक्षीच्या काया आणि महु अशा दोन मुली आणि माझा भाचा कन्नन यांच्यासह पुविधाम सुरू झालं. वर्गसंख्या होती तीन आणि शाळेची वेळ सकाळी ११ ते दुपारी३. सुरवातीला इंग्रजीमध्ये गाणी म्हणणं आणि गोष्टीवरून नाटक करून दाखवणं हे मला खूपच अवघड वाटायचं. वर्गात आम्हाला पूर्ण मोकळीक होती. काहीच दिवसात सरकारी शाळा सोडलेली काही मुलंपण आमच्याकडे यायला लागली. शाळेच्या वेळेनंतर आम्ही मुलांसाठी शैक्षणिक खेळणी, कोडी अशी साधनं तयार करत असू. ते अजूनही चालू आहे.

मीनाक्षीनं शाळेच नाव पुविधाम ठेवलं. तमिळमध्ये पूवी म्हणजे धरती आणि इथम म्हणजे सुख देणे. आम्ही धरतीची काळजी घेतो, तिला सुख देतो आणि म्हणून धरतीपण आमची काळजी घेते. शाळा मुलांना धरतीची काळजी घ्यायला आणि तिच्यावर प्रेम करायला शिकवते.

आजूबाजूचे काही लोक मीनाक्षीसोबत सेंद्रिय शेतीचा प्रयोग करत होते. त्यांची मुलंपण मग पुविधाममध्ये यायला लागली. आम्ही इथे गाणी म्हणायचो, नाच करायचो, मुख्य म्हणजे इथल्या शिक्षकांच्या हातात छडी नव्हती हे बघून मुलांना या शाळेत यावंसं वाटायचं. शाळा वर्गातच चालायची असं नाही, कधीकधी अख्खा वर्गच परिसरात फेरफटका करायला निघायचा. मुलांना जे वाटतं ते बोलायची, मनात जे प्रश्न पडतात ते मोकळेपणी विचारायची मुभा या शाळेत

नेहमीच असायची. अजूनही असतेच.

दुसऱ्या वर्षी वर्गसंख्या पंधरा झाली आणि त्यानंतरच्या दोन वर्षात वाढत जाऊन आधी पस्तीस  आणि नंतर सत्तर झाली. एका वेळेला आमच्याकडे १५० मुलं होती. दुसरं वर्ष माझ्यासाठी फार कसोटीचं होतं. साधारण तीन वर्षांचा एक मुलगा जवळजवळ रोज दुपारी एकच्या सुमारास चड्डीत शी करायचा. तेव्हा त्याचं जेवण झालेलं असायचं आणि माझी ती जेवणाची वेळ असायची. मला रोज त्याला स्वच्छ करायला लागायचं. मी अगदी वैतागून जायचो. एके दिवशी अक्कांनी मला सांगितलं की त्याचे कपडे त्यालाच स्वच्छ करू दे. त्याला ते सगळं करायला खूप वेळ लागला पण पुन्हा कपडे स्वच्छ करायला लागू नयेत म्हणून त्यानंतर शी लागली की तो आपणहून येऊन सांगायला लागला.

आजूबाजूचे बहुतेक लोक शेती करणारे होते आणि पाऊस नसेल तेव्हा ते बंगलोरच्या बाजूला बांधकामावर किंवा दगडांच्या खाणीवर काम करायला जायचे. त्यांच्या घरात मुलांकडे बघायला कोणीच नसायचं. अश्या मुलांना राहायला वसतिगृहाची गरज होती. २००४ मध्ये पाच मुलांसाठी 'सुरभी निवास' हे वसतिगृह सुरू झालं. गेल्या काही वर्षात ही संख्या वाढून आता चाळीस झाली आहे. फुकट काही मिळत नाही यावर मीनाक्षीचा ठाम विश्वास आहे. पुविधाम ही पूर्णपणे मोफत शाळा नाही. पण तशीच ती पैसेकाढू शाळा अजिबातच नाही. पालकांच्या क्षमतेनुसार शाळेची आणि वसतिगृहाची फी ठरवली आणि आकारली जाते.

**पुविधाममध्ये मी काय शिकलो?**

१) पुविधाममध्ये शिकण्याची प्रक्रिया स्वतः हातांनी करून पाहण्याशी जोडलेली आहे. शाळेच्या दैनंदिन व्यवस्थेच्या कामात मुलांसोबत शिक्षकसुद्धा सहभागी होतात.

२) शिवणकाम, मातीकाम, ओरिगामी, पाककला, रंगकाम यासारखे कलेचे आणि हस्तकलेचे बरेच प्रकार पुविधाममध्ये केले जातात. एवढंच नाही तर कापड तयार करणं (यात कापूस गोळा करण्यापासून चरख्यावर सूत कातणं हे सुद्धा मुलं करतात), बांधकाम, शेती आणि अशी कितीतरी कामं इथं केली जातात. मी वर्ध्याला आनंदनिकेतन शाळेत जाऊन सूत कसं कातायचं ते शिकून आलो. मला प्रशिक्षण देण्याचं काम तिथे एका तिसऱ्या इयत्तेतल्या मुलाला दिलं होतं. मला ते शिकायला एक आठवड्यापेक्षा जास्त दिवस लागले पण तो मुलगा कंटाळला नाही की वैतागला नाही.

३) पुविधाममध्ये फक्त तीस टक्के वेळ पुस्तकातून शिकण्यावर दिला जातो तर  सत्तर टक्के शिकणं स्वतः करून पाहण्यातून होतं. आमची सर्व मुलं काही ना काही करण्यात मग्न असतात. नवीन येणाऱ्यांनाही आम्ही संधी देतो आणि त्यांनी मांडलेल्या कल्पनाही प्रत्यक्षात आणून बघतो. एखाद्या नव्या व्यक्तीच्या जवळही काही अनुभव असतात. त्यांच्या अनुभवाबद्दल ते मुलांना सांगतात आणि मुलं न घाबरता त्यावर प्रश्न विचारतात.

४) पुविधाम शाळेला तमिळनाडू सरकारची मान्यता आहे. ही मान्यता मिळवण्यासाठीचे नियम व अटी मात्र बऱ्याच आहेत. नियमांची पूर्तता करण्यासाठी खूप पळापळ करावी लागते. स्वच्छताविषयक प्रमाणपत्र, आगप्रतिरोधक प्रमाणपत्र, पंचायतीचं 'ना हरकत' प्रमाणपत्र, तहसीलदाराचा बांधकाम पूर्णत्वाचा दाखला... एक ना दोन, अनेक प्रमाणपत्रं सादर करावी लागतात. एकंदरीनं प्रशासन हे खूपच जिकिरीचं काम आहे. विशेषतः कोणत्याही प्रकारची लाच न देता ही प्रमाणपत्रं मिळवणं ही तर अतिशय विलक्षण शिक्षणसंधी असते. दर तीन वर्षांनी मान्यता परवान्याचं नूतनीकरण करावं लागतं. अधिकाऱ्यांना पैही न देता या सर्व गोष्टी करवून घेणं ही माझ्यासाठी एक लढाईच असते. पण आता मला ते जमू लागलं आहे. अधिकारी लाच मागतात त्यावेळी मी त्याचं बिल मागतो... मग खरी मजा येते.

५) त्या त्या दिवशी काय करायचं हा निर्णय घेण्याचं स्वातंत्र्य मुलांना दिलं जातं. मुलांना कंटाळा येईल अश्या कोणत्याही गोष्टी

शिक्षण हक्क कायदा २००९ आल्यानंतर आमच्या पुविधामसारख्या शाळांना त्यातल्या नियमांच्या बंधनांचा काच सहन करावा लागतो. उदा. शाळेला सिमेंट काँक्रीटचेच छप्पर हवे. (आम्हाला कौले उतरवून स्लॅब टाकायला लागली गेल्या वर्षी.) शाळेत आम्ही काय शिकवतो, कसे शिकवतो याबद्दल त्रास दिला जात नाही, मात्र परवानगी संपल्यावर पुन्हा मिळवायची म्हणजे एक दिव्यच असते.



आठवीनंतर बरीचशी मुले पुढे शिकण्यासाठी दुसऱ्या शाळेत जातात. तिकडे गेल्यावर आपण पुविधामच्या वातावरणातून आल्यामुळे आपण इतरांपेक्षा वेगळे आहोत हे तर त्यांच्या लक्षात येतेच, पण त्याचा त्यांच्यावर दबाव येत नाही. बरेचदा ती तिथल्या मुलांचे पुढारपण करतात, शिक्षकांना मदत करतात.

आम्ही त्यांच्यावर लादत नाही. पण मुलांनाही त्यांच्या जबाबदारीची जाणीव असते.

पुविधामचा भाग असल्याचा मला आणि इथं काम करणाऱ्या सर्वांनाच अभिमान आणि आनंद वाटतो, पुविधामसोबत जोडलं जाणं ही बाहेरच्या जगातही आमची खास ओळख असते, हेही आम्हाला दिसतं.

**- जी. माधवराज**


**फॉर्म ४ वृत्तपत्र अधिनियम क्र. ८ प्रमाणे द्यावयाची माहिती.**

वृत्तापत्राचे नाव – पालकनीती
प्रसिद्धीकाल – मासिक
संपादकाचे नाव व पत्ता – डॉ. संजीवनी कुलकर्णी,
अमृता क्लिनिक, संभाजीपूल कोपरा, कर्वे रोड, पुणे – ४
राष्ट्रीयत्व – भारतीय
मुद्रक व प्रकाशकाचे नाव – पालकनीती परिवारा करिता,
डॉ. संजीवनी कुलकर्णी, अमृता क्लिनिक, कर्वेरोड, पुणे – ४
राष्ट्रीयत्व – भारतीय

**पालकनीती परिवार या सार्वजनिक विश्वस्त निधीचे विश्वस्त :**

१) डॉ. संजीवनी कुलकर्णी, अमृता क्लिनिक, कर्वेरोड, पुणे – ४
२) डॉ. विनय कुलकर्णी १०३, अश्लेषा अपार्टमेंटस्, डेक्कन जिमखाना, पुणे –४
३) नीलिमा सहस्रबुद्धे – ७, अनुप्रिता 'अ', गल्ली नं. ९, डहाणूकर कॉलनी, कोथरूड, पुणे–३८
४) शुभदा जोशी – गुरुप्रसादअपार्टमेंट, २३, आनंदनिकेतन सोसा., कर्वेनगर, पुणे–५२
५) वंदना कुलकर्णी – स्वोजस, सहवास सोसा., कर्वेनगर, पुणे–५२
६) रमाकांत धनोकर – सी, ३०१, सुनिता अपार्टमेंट, १४१७, कसबा पेठ, पुणे–११
७) प्रियंवदा बारभाई – अ–३, रोहन तपोवन, मेंढीफार्मजवळ, गोखलेनगर, पुणे–१६

मी डॉ. संजीवनी कुलकर्णी असे जाहीर करते की वरील माहिती माझ्या माहितीप्रमाणे खरी आहे.

सही

डॉ. संजीवनी कुलकर्णी


मी मूळचा कोलकत्याचा. शांतिनिकेतनमधून मी फाईन आर्ट्सची मास्टर्स डिग्री घेतली आणि पुविधाम मध्ये कलाशिक्षक म्हणून रुजू झालो. सुरवातीला मला शिकवण्यात फारसा रस नव्हता, पण पुविधामनं माझी दृष्टीच बदलून टाकली. माझ्या आत्तापर्यंतच्या आयुष्यात मी असं काहीच पाह्यलं नव्हतं. मुलं आणि शिक्षक या दोघांनाही इथं प्रयोग करून बघायची मोकळीक आहे. जर एखाद्या मुलाला शिक्षणात रस वाटत नसेल तर त्याला तसा रस वाटावा म्हणून अधिक वेळ दिला जातो. मी शाळेत असताना मलाही अभ्यासाची फार भीती वाटायची. आमचे शिक्षक अतिशय कडक होते. एखादी गोष्ट समजली नाही असं आम्ही सांगितलं तरी ती पुन्हा शिकवण्याची तसदी ते घेत नसत.

इथली परिस्थिती खूप वेगळी आहे. आम्ही प्रत्येक मुलाला समजून घेतो. गाणी, गोष्टी, नाटुकली यांचा वापर करून त्यांच्यासाठी शिकणं सहज आणि आनंददायी होईल असा प्रयत्न करतो.

कलाशिक्षक असल्यानं मी रोज काहीतरी नवीन करायचा प्रयत्न करतो. मुलांना शिकवताना त्यांच्याबरोबर मी स्वतःही शिकत असतो. आम्ही नैसर्गिक वस्तू आणि टाकाऊ वस्तू वापरून वेगवेगळ्या प्रकारचे दागिने, भिंतीवरचं सुशोभन, प्राणी आणि पक्ष्यांच्या प्रतिकृती अशा अनेक गोष्टी बनवतो. रद्दी वापरून पुन्हा हातकागद तयार करतो, शिवाय कागदाच्या लगद्यापासून आणखी बऱ्याच कलात्मक वस्तू बनवतो. मुलं या सर्व गोष्टींमध्ये अतिशय रस घेतात आणि सुंदरसुंदर वस्तू बनवतात.

**राजेश्वरराव दड्डा**



पाईपच्या छोट्या तुकड्यांनी बनवलेलं चित्र






मी पुविधाममध्ये एक वर्षापासून आहे. माझा अनुभव लहानसाच आहे, पण तेवढ्यावरूनही मला असं वाटतं की जगाला अश्या अनेक शाळांची गरज आहे. सध्याच्या शिक्षणपद्धतीत मुलांचं परीक्षेतल्या गुणांवरून मूल्यांकन होतं आणि त्यांच्यावर पास–नापासाचा म्हणजे सक्षम–अक्षमतेचाच शिक्का मारला जातो.

आमच्या शाळेत मात्र परीक्षाच नसते. आमची मुलं आम्हा शिक्षकांना दादा ताई म्हणतात. आमच्यात आपलेपणाचं आणि प्रेमाचं नातं असतं. आम्ही गाणी गातो, गोष्टी सांगतो आणि खूप धमाल करतो. कमीतकमी प्रदूषण होईल अशी जीवनशैली इथं शिकवली जाते. तुम्ही कुठलंही काम करत असलात तरी निसर्गाची जोपासना करणं, उपलब्ध संसाधनांचा जपून वापर करणं आणि निर्माण होणाऱ्या कचऱ्याचा जास्तीत जास्त पुनर्वापर करणं ह्या गोष्टींचा आग्रह इथले शिक्षक धरणारच. मुलांना सेंद्रिय धान्य दिलं जातं, मुलं त्यांना मोड आणतात, पालेभाज्या घालून चविष्ट आणि पौष्टिक खाऊ तयार करतात. नेहमीच्या वापरातल्या औषधी वनस्पतींची लागवड करतात. त्यांना साध्या आजारांवरचे घरगुती उपचारही माहीत असतात. ॲलोपॅथीच्या औषधांचा उपयोग आम्ही शक्यतो टाळतो. अशी शिक्षणपद्धती जर सर्व शाळांत राबवली तर आपापसातील कलह कमी होतील.

**मुथुलिंगम**




मी डी.एड.केलं आणि एका शाळेत शिक्षक म्हणून रुजू झाले. पुविधाम माझ्या घराच्या जवळच होतं म्हणून मग मी तिथं जायचं ठरवलं. मी माझ्या लहानपणापासून मीनाक्षीअक्काला ओळखत होते, तरीही माझ्या मनात थोडी भीती आणि संकोच होता. कारण अक्का इंग्लिशमधून बोलते आणि मला तर शाळेत असल्यापासून इंग्लिशची भीती! मी भीतभीतच तिथं माझ्यासाठी काम मिळेल का हे विचारायला गेले. मला संधी मिळाली आणि २००८ पासून मी इथं काम करत आहे. गेल्या दहा  वर्षांपासून मी शिक्षणसमन्वयक म्हणून इथं काम करते. पण शिकवण्यापेक्षा जास्त  मी स्वतःच शिकते आहे. मी इंग्लिश तर शिकलेच पण त्याचबरोबर विचार कसा करायचा हेही शिकले. मुलं रोज नवनवीन प्रश्न विचारतात त्यातूनही मला शिकायला मिळतं. इथं मुलं आणि शिक्षकांचे वेगवेगळे गट केले जात नाहीत तर एखाद्या मोठ्या कुटुंबाप्रमाणे आम्ही एकत्र राहतो आणि एक चांगला माणूस बनण्याचा प्रयत्न करतो. मुलांमध्ये कोणतीही स्पर्धा नसते. शाळेत मुलांनी कुठं जायचं, कुठं नाही अशी कुठलीही बंधनं इथं नसतात.

मुली मुलं हव्या तेवढ्या गोष्टी शिकतात आणि कलात्मक वस्तू तयारही करतात. तसा आत्मविश्वास त्यांना इथं मिळतो. ती सेंद्रिय शेती करतात, साबण, टूथ पावडर, हातकागद, कागदी पिशव्या बनवतात. जुन्या कपड्यांचा पुनर्वापर करून सॅनिटरी पॅडस, पिशव्या बनवतात, कॅलेन्डर बनवतात, सुंदर भरतकाम करतात. नारळाच्या करवंटीपासून, मातीपासून वेगवेगळ्या प्रकारचे दागिने आणि इतर गृहोपयोगी वस्तू, स्क्रॅच प्रोग्रामिंग वापरून कॉम्प्युटर प्रोग्राम्स करतात. इंटरनेट वापरतात, माहिती शोधतात. स्वतंत्र विचार करू शकतात. घोकंपट्टी न करता नव्या गोष्टी शिकून समजून घेऊ शिकतात. वेगवेगळी कामं करण्यासाठी आपल्याला पुस्तकात लिहिलेलं असतं त्यापेक्षा कितीतरी जास्त गोष्टी शिकाव्या लागतात, असं माझ्याही इथे आल्यावर लक्षात आलं. पुविधाम हे माझं घरच आहे आणि ह्या आमच्या घरात १०० माणसांसह कितीतरी छोटे प्राणी, पक्षी, कीटक एवढंच नाही तर सरपटणारे प्राणीसुद्धा राहतात.

**रामेश्वरी**

# शाश्वत विकासासाठी शिक्षण

निकिथा हरिहरन



• स्वतंत्र विचारांची शिक्षिका,
• 'तमिळनाडू मधील अपारंपरिक शिक्षण-पद्धतीची जननी'
• अवल विकडन (विशेषत: स्त्रियांच्या सबलीकरणाबद्दलच्या) या वर्तमानपत्राने जाहीर केलेल्या २०१६ मधील 'तमिळनाडूमधील दहा सर्वात प्रभावशाली स्त्रियांच्या यादीमधील एक'

ही मीनाक्षीची काही बिरुदे.

शिकण्याच्या आनंदापासून वंचित ठेवणाऱ्या शिक्षणाचा अनुभव लहानपणी तिनं घेतलेला होता. ह्या अनुभवातून आणि जाणिवेतून पुविधाम सुरू करण्याच्या कल्पनेचा उदय झाला. काहींना अडचणी समोर दिसल्या की कापरं भरतं तर काहींना त्या आव्हानांना सामोरं जायचं असतं, त्यांच्यावर चढाई करायची असते.

काही वर्षं गेली. आजूबाजूच्या गावातली मुलंही आवडीनं पुविधाममध्ये यायला लागली.

मुलं, पालक आणि महत्त्वाचं म्हणजे पर्यावरण यांच्यासोबत पुविधामचाही विकास होत गेला. पुविधाममध्ये मुलं पर्यावरणपूरक स्थापत्य, बांधकाम, सेंद्रिय शेती, जलसंवर्धन शिकतात. एवढंच नाही तर साबण, कागद बनवणं, पाककला, बागकाम, वेगवेगळ्या कला अशी बहुविध कौशल्यं आत्मसात करतात. हे सगळं करताना त्यात पर्यावरणाचाही विचार केलेला असतो.

पुविधाममध्ये शिक्षकांसाठी अपारंपरिक शिक्षणाच्या कार्यशाळा, मुलांचा कल ओळखून त्याप्रमाणे अपारंपरिक शिक्षण कसं दयावं याची सत्रं पालकांसाठी आयोजित केली जातात. स्वयंसेवक आणि कार्यकर्ते यांच्यासाठी तर ही एक प्रयोगशाळाच आहे.



शाळा ही सगळ्या समाजाचाच एक भाग असली पाहिजे आणि रोजच्या जगण्याशी आणि वास्तवाशी जोडली गेलेली असली पाहिजे. पुविधाममध्ये मुलांना आयती माहिती दिली जात नाही तर त्यांच्या हातात साधनं दिली जातात आणि गोष्टी करून बघायला, शोधून काढायला त्यांना अवसर दिला जातो. गोष्टी, गाणी, नाटुकली, चित्रं यांचा उपयोग करून विज्ञान, गणित आणि सामाजिक विषयांमध्ये त्यांना रस निर्माण होईल आणि संकल्पनाही स्पष्ट होतील अश्या पद्धतीनं ते शिक्षण त्यांच्या समोर येतं.

इथं मुलं तुम्हाला बागकाम, सुतारकाम, मातीकाम आणि भरतकामसुद्धा करताना दिसतील. सर्वच संसाधनं आणि वस्तूंचा जपून, पुरेपूर उपयोग केला जातो. प्लास्टिकचा वापर कमीतकमी केला जातो. उरलेल्या अन्नाचं कम्पोस्ट खत केलं जातं, जुने कपडे रोपांच्या भोवतीची जमीन झाकण्यासाठी वापरले जातात. रद्दी कागदाचा वापर पुन्हा हातकागद बनवण्यासाठी केला जातो. सांडपाण्याचा उपयोग बागेसाठी केला जातो. अश्या रीतीनं इथं कमीतकमी कचरा निर्माण होईल हे पाहिलं जातं. शहरी उपभोगवादी आणि







भांडवलशाही जीवनशैलीमध्ये निसर्गाशी फटकून वागलं जातं, इथं त्याच्या अगदी विरुद्ध गोष्ट केली जाते. त्या सगळ्यांमधून मुलांमध्ये उपलब्ध संसाधनांचा काळजीपूर्वक वापर करण्याची जाणीव निर्माण होते.

मुलं मातीच्या जवळ जातात, तिच्याशी नातं निर्माण करतात, स्वतःला समाजाचा एक भाग मानतात आणि त्यामुळे सहवेदना, दया आणि सहानुभूतीची जाणीव त्यांच्यामध्ये आपोआपच निर्माण होते.

**निकीथा हरिहरन**

बंगलोरस्थित वास्तुविशारद

Published and posted on 16 March 2017
Posted at Marketyard PSO, Pune 411037.
on 16th of each month.

RNI No. MAH MAR 2001/4166
Registered No. PCW / 026 / 2015-2017

**आधारशिला लर्निंग सेंटर**
गाव साकड, पोस्ट- चाटली, सेंधवा.
जि. बडवानी, मध्यप्रदेश - ४५२६६६
दूरभाष :
+९१ ९६८५८४३२७२ / ८८८९२८९१९६
इमेल :
adharshila.learningcentre@gmail.com
संकेतस्थळ :
www.adharshilalearningcentre.org







**पुविधाम लर्निंग सेंटर**
नागरकुडल, पोस्ट- इंडूर,
धर्मपुरी, तामिळनाडू - ६३६८०३
इमेल : puvidham@gmail.com

